महाराष्ट्र शासन

# १०० दिवस

# विश्वासार्ह,
# पारदर्शक,
# दमदार वाटचाल!







**श्री. उद्धव ठाकरे**
मा. मुख्यमंत्री

**श्री. अजित पवार**
मा. उपमुख्यमंत्री

**श्री. बाळासाहेब थोरात**
मा. मंत्री, महसूल

मुख्यमंत्री श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी २८ नोव्हेंबर २०१९ रोजी पदभार स्वीकारला. उपमुख्यमंत्री श्री. अजित पवार यांच्यासह ३३ मंत्री आणि १० राज्यमंत्री यांच्यासह कामकाजास सुरुवात केली आहे त्याला १०० दिवस पूर्ण होत आहेत. या कमी कालावधीत शासनाने अनेक लोकाभिमुख आणि सर्वसमावेशक असे निर्णय घेतले. सर्वप्रथम स्वराज्याची राजधानी रायगड या किल्ल्याच्या संवर्धनासाठी निधी देऊन सरकारच्या कामाला सुरुवात केली.

शिवभोजन योजना, महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजना, विभागीय मुख्यालयांमध्ये मुख्यमंत्री सचिवालये सुरू करणे अशा विविध निर्णयांची अंमलबजावणी सुरू झाली तर निर्णयांच्या अंमलबजावणीला चालना देण्यात आली. या पुस्तिकेत अनेक निर्णय, धोरण, निर्देश या ठिकाणी संकलित करण्यात आले आहेत. सर्वच विभागांची माहिती पुस्तिकेत समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

या योजना, निर्णयांच्या अंमलबजावणीत प्रसारमाध्यमांनी सकारात्मक प्रतिसाद दिला. मुद्रित, ईलेक्ट्रॉनिक आणि नवमाध्यमांनीही निर्णयाच्या अंमलबजावणीची मीमांसा केली आहे. त्याबाबतची काही कात्रणे येथे प्रातिनिधिक स्वरूपात समाविष्ट आहेत.

शासनाच्या दूरगामी वाटचालीची दिशा समजण्याच्या अनुषंगाने ही पुस्तिका उपयुक्त ठरेल असा विश्वास आहे.

– माहिती व जनसंपर्क महासंचालनालय



# महात्मा जोतिराव फुले
# शेतकरी कर्जमुक्ती योजना

**महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेत ३० सप्टेंबर २०१९ पर्यंत थकबाकी असलेल्या सर्व पीककर्ज खात्यांना २ लाख रुपये मर्यादेपर्यंत कर्जमुक्तीचा लाभ.**




कर्जाची चिंता मिटली, आता लेकीच्या लग्नाला या!

सरकारच्या कर्जमुक्तीने बळीराजा सुखावला

आशीर्वादाच्या अक्षता टाकायला या!

कर्जमाफीचे पैसे उद्यापासून जमा

सव्वालाख शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण पूर्ण

# चिंता मिटली!



सहकारी बँकेचे १ लाख ७० हजार रुपयांचे कर्ज होते. हे कर्ज माफ झाले. माझ्या खात्यावर पैसेसुध्दा जमा झाले आहेत. यामुळे माझे शेतीचे उत्पन्न वाढेल आणि माझ्या मागची चिंता मिटून जाईल.

**-अंकुश जानकोजी नरोडे,**
**रा. पाचोड, औरंगाबाद**





आयुष्याच्या उत्तरार्धात कर्जमुक्तीची चिंताच संपली

'आपले सरकार' केंद्राची लकवाग्रस्त शेतकऱ्याला घरपोच सेवा

१००% दिवस

# शेतकरी कर्जमाफीची दुसरी यादी जा…

## २८ जिल्ह्यांतील २१ लाख ८२ हजार शेतकऱ्यांचा समावेश



दुसरी यादी

२८ जिल्हे

२१,८२,०००

शेतकऱ्यांची एकूण कर्जमाफी

आधार प्रमाणीकरणानंतर रक्कम बँक…

आचारसंहिता संपल्यानंतर सहा जिल्ह्यांना लाभ

# Loan waiver: State releases second list with 21.8L farmers

THE SCHEME

# कर्जमुक्ती योजनेची दुसरी यादी जाहीर

## २१ लाख ८२ हजार जणांचा समावेश

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी



# रुग्णालयात झाली थाळनेरची यमुनाबाई कर्जमुक्त

## शेतकरी कर्जमुक्त योजना : शिरपूरला आधार प्रमाणीकरण प्रमाणपत्राचे वितरण



१०० दिवस %

महात्मा जोतिराव फुले
शेतकरी कर्जमुक्ती योजना

# ना कुठली रांग, ना कुठला त्रास

**महसूल, सहकार आणि माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या उत्कृष्ट समन्वयातून शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात थेट रक्कम जमा .**







- केवळ २ ते ३ मिनिटांत प्रमाणीकरण.
- प्रमाणीकरण, तक्रार नोंद पावती मराठीतच.
- आधार प्रमाणीकरणामुळे अर्ज करण्यासाठी रांगा नाहीत.
- वेगवान पोर्टलवरील विविध मोड्यूल्समुळे तांत्रिक अडचणी तत्काळ दूर.
- केवळ २८ दिवसांत पोर्टल सुरू. संपूर्णपणे महाआयटीतर्फे विकसित सॉफ्टवेअर.
- सहकार व महसूल विभागावर योजनेची संपूर्ण जबाबदारी. माहिती तंत्रज्ञान विभागाने दिले अविरत तांत्रिक सहकार्य.
- कुठलाही फॉर्म भरून घेतला जात नाही. शेतकऱ्यांना पोर्टलवर ऑनलाईन लॉगिन करण्याची आवश्यकताच नाही.
- उच्च क्षमतेचे सर्व्हर व क्लाऊड तंत्रज्ञानाचा वापर. यामुळे ८० हजारांपेक्षा जास्त 'आपले सरकार सेवा केंद्र' व बँकांकडून सुलभपणे दररोज ४ लाखांहून अधिक शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण.

## कृषी

- जागतिक बँकेच्या २१ हजार कोटींच्या अर्थसाहाय्याद्वारे राज्यात शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र राज्य कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (SMART) प्रकल्प.



- शेतकऱ्यांना एकाच अर्जावर कृषी विभागाच्या सर्व योजनांचा लाभ, खरीप हंगामापासून अंमलबजावणी.
- अतिवृष्टीमुळे बाधित विदर्भातील शेतकऱ्यांना ६८ कोटी ९४ लाख  २७ हजार रुपयांची आर्थिक मदत
- कृषी विकासासाठी 'लॅब ते लॅण्ड'संकल्पनेवर भर.
- तालुकास्तरावर शेतकरी सन्मान व मार्गदर्शन कक्ष. राज्यातील ५५० कार्यालयांमध्ये केंद्रे कार्यान्वित.



# पणन

- कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणुकीत पूर्वीप्रमाणेच सहकारी संस्थांच्या माध्यमातून संचालक पदाची निवड.

**महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाकडून २०१९-२० मध्ये किमान हमी भावाने खरेदी करण्यात येणाऱ्या कापसाचे चुकारे शेतकऱ्यांना वेळेत देण्यासाठी कापूस पणन महासंघाने बँक ऑफ इंडियाकडून ७.७५ टक्के या व्याजदराने घेत असलेल्या १८०० कोटीच्या कर्जास शासन हमी .**





पद्मश्री राहीबाई पोपेरे

**बियाण्यांच्या जुन्या वाणांच्या संवर्धनाचं काम राज्यातील शेतकऱ्यांपर्यंत नेणार.**

## माहिती तंत्रज्ञान

## मुख्यमंत्री डॅशबोर्ड

- मुख्यमंत्र्यांना सर्व शासकीय विभागांमधील कामकाजाची अद्ययावत आणि अचूक माहिती तातडीने मिळावी यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने 'चीफ मिनिस्टर डॅशबोर्ड' तयार केला असून विविध विभागांच्या योजना, उपक्रमांची अद्ययावत आकडेवारी आणि विस्तृत अहवाल तयार केले जातात.

- या माहितीचा उपयोग मुख्यमंत्र्यांना प्रशासनाच्या कामगिरीचे विश्लेषण करतांना होतो. तसेच कुठल्या विभागात, क्षेत्रात, कोणत्या अडचणी आहेत हे निश्चित करून प्राधान्यक्रम ठरविता येतो.

## आपले सरकार पोर्टल

- मंत्रालयापासून ते तालुका पातळीपर्यंत नागरिक या पोर्टलवर तक्रारी दाखल करू शकतात. तसेच या तक्रारींचा पाठपुरावा करू शकतात. केवळ तक्रारीच नव्हे तर नागरिक डॅशबोर्ड पाहून शासनाच्या कामगिरीचा आढावा घेऊ शकतात.

- राज्यातील  विभागीय आयुक्तालयांमध्ये मुख्यमंत्री सचिवालये आहेत, त्यांनीदेखील या पोर्टलवरून त्यांच्या विभागातील नागरिकांच्या वतीने तक्रारी  टाकता येतील अशी सोयीस्कर व्यवस्था करण्यात आली आहे.



१००% दिवस

# शिवभोजन

## गरीब आणि गरजू यांच्यासाठी आहार





# १० रुपयांत भोजन

**शिवभोजन योजनेचा विस्तार थाळी संख्या दुप्पट, थाळींची संख्या १८ हजारांवरून ३६ हजार.**



# 'शिवभोजना'ची व्याप्ती वाढवणार'

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

### अन्न व नागरी पुरवठामंत्र्यांचे आश्वासन



### 'उज्ज्वला' लाभार्थींना केरोसिन?

# महाराष्ट्रात शिवभोजन योजनेचा शुभारंभ

लोकमत न्यूज नेटवर्क


# जेवण आवडलं का? समाधानी आहात ना?

### मुख्यमंत्र्यांनी केली विचारणा, साधला शिवभोजन योजनेतील लाभार्थ्यांशी संवाद





### योजनेची व्याप्ती वाढवावी लागेल- भुजबळ



# शिवभोजन योजनेची व्याप्ती वाढवणार

## छगन भुजबळ यांची माहिती; अर्थसंकल्पात १५० कोटी रुपयांच्या तरतुदीची मागणी



छगन भुजबळ

मुंबई, ता. २ : राज्यशासन शिवभोजन योजनेची व्याप्ती वाढविणार असून, लवकरच राज्यात एक लाख थाळ्या दररोज देण्याचा कार्यक्रम आखला असून, तालुकास्तरापर्यंत याची व्याप्ती वाढविण्याचे विचाराधीन असल्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी आज विधानसभेत सांगितले.

विधानसभेत अन्न व नागरी पुरवठा, ग्रामविकास, सहकार, वस्त्रोद्योग या विभागांच्या पुरवणी मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना भुजबळ बोलत होते.

भुजबळ म्हणाले, की शिवभोजन योजनेची व्याप्ती वाढविण्याची मागणी केली जात आहे, त्यासाठी १५० कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. शिवभोजन ही प्रायोगिक तत्त्वावरील योजना असून टप्प्याटप्प्याने तिची व्याप्ती वाढविण्यात येणार आहे. मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर यांसारख्या महत्त्वाच्या शहरांमध्ये भोजन केंद्रांची संख्या वाढविण्यात येणार असून, थाळींची संख्यादेखील वाढवली आहे.

### रस्त्यांचे काम प्रगतिपथावर

ग्रामविकास विभागाच्या मागण्यांवरील चर्चेला उत्तर देताना मंत्री हसन मुश्रीफ म्हणाले, की राज्यात मुख्यमंत्री ग्रामीण सडक योजना सुरू राहावी यासाठी प्रयत्न करण्यात येत असून, या योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात १० हजार किलोमीटर लांबीचे रस्ते निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. राज्यात सध्या १६ हजार ७०० किलोमीटर लांबीच्या रस्त्यांचे काम प्रगतिपथावर असून १० हजार किलोमीटर लांबीचे रस्ते पूर्ण झाले आहेत. तसेच, पंचायत समित्यांना आर्थिक अधिकार देण्याचा प्रयत्न आहे.

## राज्य सरकारचा विचार; १२५ कोटी रुपयांच्या निधीची लवकरच तरतूद

# एप्रिलपासून दररोज एक लाख जणांना शिवभोजन



# Shiv Bhojan thaali a success in State

Govt. planning to add 500 centres and over one lakh plates



# 'शिव भोजन' की एक लाख थाली

मुंबई, कासं. सरकार की 'शिव भोजन' योजना को राज्य भर में अच्छा प्रतिसाद मिल रहा है.सरकार इस योजना के तहत हर रोज सब्सिडी प्राप्त थालियों की संख्या बढ़ाकर एक लाख करने वाली है. यह जानकारी खाद्य एवं नागरिक आपूर्ति मंत्री छगन भुजबल ने विधानसभा में दी. उद्धव ठाकरे के नेतृत्व में महाविकास आघाड़ी सरकार गठित होने के बाद राज्य में 'शिव भोजन' योजना शुरू की गयी है.इसके तहत शिवभोजन केंद्रों पर 10 रुपए में थाली उपलब्ध करायी जाती है.

# शिवभोजनाला नागरिकांची पसंती

## योजनेतील लाभार्थ्यांशी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंचा संवाद; एक लाख थाळ्यांचे उद्दिष्ट



## सामाजिक न्याय


- सामाजिक न्याय विभागाच्या विविध योजनांचा निधी लाभार्थ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी सर्वंकष विकास आराखडा तयार केला जात आहे.



- राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या उपस्थितीत व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या २१ आणि २२ मार्च १९२० रोजीच्या पहिल्या ऐतिहासिक माणगांव परिषदेचा शताब्दी महोत्सव समारंभ २१ मार्च २०२० रोजी माणगांव (ता. हातकणंगले) येथे होणार.
- तृतीयपंथीय कल्याण मंडळाची नजीकच्या काळात स्थापना.
- योजना सर्वसामांन्यापर्यंत पोहोचवण्यासाठी मराठी भाषेत हेल्पलाइन सुरू करणार.



दादर येथील इंदू मिलच्या जागेवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकातील पुतळ्याची उंची ३५० फुट इतकी करण्याचा निर्णय.



मुंबईतील सफाई कर्मचाऱ्यांसाठी १६ हजार घरे  उपलब्ध करून देणार.



बीआयटी चाळ-परळ येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वास्तव्य असणारे घर, तसेच चिराग नगर-घाटकोपर येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे वास्तव्य असणाऱ्या घराच्या ठिकाणी राष्ट्रीय दर्जाची स्मारके उभारणार.



## इतर मागास व बहुजन कल्याण

- इतर  मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागासप्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग यापुढे 'इतर मागास व बहुजन कल्याण' विभाग म्हणून ओळखला जाणार.




विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासप्रवर्ग व विशेष मागासप्रवर्ग विद्यार्थ्यांना त्यांच्या १६ इतर शुल्कांचे अनुदान मिळणार. त्याचा लाभ अनुदानित व विनाअनुदानित/कायम विनाअनुदानित महाविद्यालयांतील व्यावसायिक व बिगर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना मिळणार.



# गिरणी कामगारांना घरे

**गिरणी कामगांरासाठी म्हाडाच्या ३ हजार ८९४ सदनिकांची सोडत.**



# गिरणी कामगार बेघर राहणार नाही!

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची घोषणा; ३८९४ घरांची सोडत जाहीर

घरे विकून मुंबई गमावू नका!



३,८९४ जणांचे गृहस्वप्न साकार; लॉटरीसाठी म्हाडात तुडुंब गर्दी

# घरं विकून मुंबईवरचा हक्क गमावू नका!

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे गिरणी कामगारांना आवाहन




# घरे विकून मुंबई गमावू नका

## मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे गिरणी कामगारांना आवाहन



वडील असताना गेल्या सहा-सात वर्षांपासून म्हाडाच्या घरासाठी मी अर्ज करत होतो. आता कुठे म्हाडाच्या सोडतीमध्ये घर मिळाले, परंतु वडील गेल्याचे दुख आहे. सांताक्रूझमध्ये १० बाय १० च्या खोलीत आई, पत्नी आणि दोन मुलांसोबत राहतो. आज माझ्या वडिलांचे स्वप्न पूर्ण झाले आहे. उद्धव ठाकरे यांच्या सरकारने आठ दिवसांमध्ये गिरणी कामगारांसाठी एवढा मोठा निर्णय घेतला, हीच मोठी गोष्ट आहे.

\- अतुल मालवणकर



म्हाडाच्या घरांच्या सोडतीच्या यादीत वडिलांचे नाव बघितले आणि थेट त्यांना दूरध्वनी करून आनंदाची बातमी दिली. वडील खूप खूश झाले. तब्बल १२ वर्षांनंतर मुंबईत हक्काचे घर मिळाल्याने आनंद द्विगुणीत झाला. मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी मागितलेले वचन कायम पाळणार. कारण मुंबईत घर असणे सर्वात महत्त्वाचे आहे.

\- प्रकाश सावंत



चार ते पाच वर्षे म्हाडाच्या घरासाठी अर्ज करत आहे. मुंबईमध्ये घर मिळत नाही म्हणून पुण्यात राहत आहे. आज तरी मुंबईमध्ये घर मिळेल अशी आशा होती. मात्र निराशाच पदरात पडली. पण प्रतीक्षा यादीमध्ये नाव असल्याने आशा कायम आहे. घर मिळेपर्यंत अर्ज करायचाच, असे ठरवले होते.

\- प्रसाद ठाकूर

# 'मिळालेली घरे विकू नका'

## गिरणी कामगार कुटुंबीयांना मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचे आवाहन




'संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात रक्त सांडून मिळविलेली मुंबई आपली असून, घर विकून मुंबईतील हक्क गमवायला बसू नये.'

- मुख्यमंत्री उद्धव ठाकरे

**घराचा आनंद पण...**

**उद्धव म्हणाले...**

- मुंबईतील गिरणी कामगार, मराठी माणूस हा ठाकरेंच्या हृदयातील विषय
- त्यांच्या घरांची सोडत हा कौटुंबिक कार्यक्रम
- यातील एकही घर विकायचे नाही



### आता मोकळा श्वास मिळेल

१९९२ पासून बॉम्बे डाईंग स्प्रिंग मिलमध्ये काम करतोय. पण हातात येणारा पगार बेताचा असल्याने आईच्या नावावर असलेल्या दादर-नायगाव येथील १८५ चौरस फुटाच्या खोलीत माझे आणि भावाचे कुटुंब कसबसे दिवस काढत होते. पण आता मला हक्काचे २२५ चौरस फुटांचे प्रशस्त घर मिळाल्याने मोठा आनंद झाला आहे. आमच्या कुटुंबाला आता मोकळा श्वास घेता येईल, अशी प्रतिक्रिया संतोष राजाराम मोरे यांनी व्यक्त केली.



### घर मिळालंय यावर विश्वासच बसेना

बॉम्बे डाईंग मिलमध्ये मी दहा वर्षे नोकरी केली आहे. येथे माझे वडील, दोन भाऊ, तीन चुलते कामाला होते. माझ्यापेक्षा त्यांनी जास्त काळ काम केले आहे. पण म्हाडाने काढलेल्या लॉटरीत मी नशीबवान ठरलो आहे. पण मला घर लागलंय यावर विश्वासच बसत नसल्याची प्रतिक्रिया समीर मकबूल हवलदार यांनी दिली. आता नक्कीच हक्काच्या घरात आनंदाने जाईन असेही ते म्हणाले.




### आनंद गगनात मावेना

म्हाडाने काढलेल्या लॉटरीत घर लागेल आणि आपण हक्काच्या घरात जाऊ असे कधी वाटलेच नव्हते. पण आज माझे नशीब उघडल्याची प्रतिक्रिया अनिता अनंत मालवणकर यांनी दिली. वर्षानुवर्षे वाकोला येथील १० बाय १० चौरस फुटांच्या खोलीत राहत असल्याने आपल्या हक्काचे घर असावे असे स्वप्न होते ते आज सत्यात उतरल्याने आनंद झाला असल्याचे अनिता यांनी सांगितले. त्यांना श्रीनिवास मिलमध्ये घर मिळाले आहे.

# Housing lottery draw puts a smile on mill workers' faces





१०० दिवस %

## गृहनिर्माण


- **सर्वांसाठी घरे, झोपडपट्टीमुक्त मुंबईसाठी एकच नियोजन प्राधिकरण होणार.**
- गृह निर्माण क्षेत्रातील विकासकांच्या कामांच्या समस्या सोडविण्यासाठी ‘क्विक रिस्पॉन्स विंडो’, त्यासाठी सुकाणू समिती स्थापन.
- शासकीय जमिनीवरील निवासी सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका भाड्याने देताना, परवानगीची आवश्यकता नाही, अनुज्ञप्ती शुल्क नाही.
- मागाठणे एम. एच. बी. कॉलनी, बोरिवली येथील संक्रमण शिबिरातील रहिवाशांना येत्या दीड वर्षात म्हाडातर्फे त्यांच्या हक्काची घरे बांधून देणार.
- म्हाडाच्या माध्यमातून कामाठीपुराचा समूह पुनर्विकास त्यासाठी विकास आराखडा तयार करणार.
- झोपडीत प्रत्यक्ष राहाणाऱ्या व्यक्तिलाच म्हाडातर्फे घरे देणार.
- म्हाडामध्ये चतुर्थ श्रेणी शासकीय कर्मचारी व पोलिसांसाठी प्रत्येकी दहा टक्के घरे राखीव.






**झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प योजनांची तांत्रिक तपासणी जलद गतीने व अधिक पारदर्शकपणे करण्यासाठी 'ऑटो डीसीआर' प्रणाली लागू करण्यात येणार.**

**धारावी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत लघुउद्योगांना वेगळी जागा.**




- **बीडीडी चाळीतील रहिवाशांची पात्रता -अपात्रता निश्चित करण्यासाठी अतिरिक्त जिल्हाधिकारी दर्जाच्या अधिकाऱ्याची नियुक्ती करून 'बीडीडी सेल' स्थापन होणार.**

**गृहनिर्माण क्षेत्राच्या विकासासाठी बँकांनी आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देण्याचे आवाहन. मुख्यमंत्री श्री. उद्धव ठाकरे आणि ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या समवेत बँकांच्या प्रतिनिधींची बैठक.**



## सार्वजनिक आरोग्य


- महात्मा फुले जनआरोग्य योजनेचा आणखी विस्तार. एक हजार रुग्णालयांचा समावेश. प्रत्येक तालुक्यातील एका रुग्णालयाचा समावेश.
- औरंगाबादेत प्रस्तावित २०० खाटांचे महिला व बालरुग्णालय याबाबतही शासन सकारात्मक.
- शालेय विद्यार्थ्यांना मोफत चष्मे पुरविणार. दृष्टिदोष असलेल्या मुलांना सार्वजनिक आरोग्य विभागातर्फे त्यांच्या घरी अथवा शाळेत मोफत चष्मे पोहचविण्यात येतील.
- सर्व जिल्हा रुग्णालयांमध्ये केमोथेरपीची सुविधा.
- अमळनेर रुग्णालयाचा दर्जा उन्नत करण्यास मान्यता



हृदयविकारामुळे होणारे मृत्यू रोखण्यासाठी राज्यात दहा जिल्ह्यांमध्ये 'स्टेमी' प्रकल्प.

आरोग्यविषयक प्रतिबंधात्मक आणि प्रबोधनात्मक सेवा लोकांपर्यंत पोहचविण्यासाठी राज्यातील उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्रे व नागरी प्राथमिक केंद्रांचे आरोग्यवर्धिनी केंद्रात रूपांतर. राज्यात साडे सहा हजार आरोग्यवर्धिनी केंद्रे.






उच्च रक्तदाबाच्या रुग्णांवरील उपचार व त्याचा पाठपुरावा करण्यासाठी चार जिल्ह्यात प्रायोगिक तत्त्वावर वापरण्यात येणारे ‘सिम्पल ॲप’ दुसऱ्या टप्प्यामध्ये नऊ जिल्ह्यात वापरण्यात येणार. ॲपच्या माध्यमातून मधुमेह रुग्णांचीदेखील नोंद.

## आदिवासी विकास

आदिवासींमधील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी ‘मुख्यमंत्री संकल्प कक्ष’च्या माध्यमातून सातत्याने आढावा घेणार.

आदिवासी जिल्ह्यातील १ लाख ४0 हजार मुलांच्या न्यूमोनिया प्रतिबंधक लसीकरणासाठी तातडीने निधी.



## पर्यावरण

- नाग नदीचे प्रदूषण रोखण्यासाठी प्रकल्पाच्या खर्चाच्या कर्जास शासन हमी.
- पर्यावरण रक्षणासाठी प्लॅस्टिकमुक्तीसाठी ठोस कार्यक्रमांची आखणी व अंमलबजावणी. थर्मोकोलच्या वापरावरही कडक निर्बंध.

## पशु संवर्धन

- राज्यात फिरते पशुचिकित्सालय सुरू करणार.
- लातूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी दूधसंकलन अंतर्गत दूध भुकटी प्रकल्प कार्यान्वित करण्यात येईल.



देवणी येथे गायीचे आंतरराष्ट्रीय पशुसंशोधन केंद्र. दर्जेदार देवणी गायीच्या वाणसंवर्धनासाठी प्रयत्न. केंद्रासाठी जागा देणार.



सर्व मागासवर्गीय महिला सहकारी संस्थांना शेळी गटाचे वाटप करणार.



विदर्भ, मराठवाडा विभागात दुधाचे उत्पादन दुप्पट व्हावे यासाठी एनडीडीबी आणि सहयोगी संस्थाद्वारे नियोजनबद्ध प्रयत्न करणार.

## मत्स्य व्यवसाय विकास

- जिल्हा परिषदांचे तलाव मासेमारी साठी खुले करणार, २० हजार जलाशयांमुळे पाच लाख रोजगाराची निर्मिती होणार.
- सर्जेकोट, राजकोट, नवाबाग येथे जेटींची उभारणी
- अवैध मासेमारीविरुद्ध कडक कारवाई सुरू



राज्यात शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी जाहीर करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर मच्छीमारांना कर्जमाफी देण्याबाबत विचार. अशा मच्छीमारांचे सर्वेक्षण करणार.

मच्छीमारांच्या डिझेल अनुदानासाठी ५ कोटी ४० लाख रुपयांचा निधी



## ग्रामविकास




सरपंचांची निवड थेट लोकांमधून करण्याऐवजी आता निवडून आलेल्या सदस्यांमधूनच होणार

## ऊर्जा

- राज्यातील कृषी वीज ग्राहकांच्या थकबाकी संदर्भात व उद्योजकता वाढीसाठी नवीन ऊर्जा धोरण.

समुद्रलाटांपासून वीज निर्मिती आणि पर्यायांच्या तपासणीसाठी आयआयटी चेन्नईची मदत घेणार.



## महिला व बालविकास

- राज्यात ९८ अंगणवाडी आणि ७४५ मिनी अंगणवाडी सुरू करण्यास मान्यता.
- ऊसतोडणी मजुरांच्या मुलांसाठी निवासी शाळा योजना सुरू करणार.
- राज्यातील बालसंस्थांमधील मुलांचे कल्याण आणि पुनर्वसन करण्याकरिता 'बाल न्याय निधी' निर्माण करणार, त्यासाठी दोन कोटी रुपयांची तरतूद .
- महिला आर्थिक विकास महामंडळांतर्गत तेजश्री फायनान्शिअल सर्व्हिसेस या योजनेचा शुभारंभ. त्यासाठी ३१ कोटींचा निधी वितरित.
- बचत गट चळवळीद्वारे महिला सक्षमीकरण करण्याचे आणि बालगृह, अनाथमुले, बालकल्याणासाठी नवीन योजना आणणार.

**राज्यातील अंगणवाडी सेविका व मदतनीसांची ६ हजार पदांची भरती करणार.**



# शालेय शिक्षण



- शाळांच्या वीजबिलांचा प्रश्न सोडवण्यासाठी अखंड वीजपुरवठा व्हावा म्हणून महाऊर्जाच्या (मेडा) माध्यमातून शाळांमध्ये सौरवीज प्रकल्प.
- दिल्लीतील शाळांच्या धर्तीवर मुंबईसह पाच महानगरपालिकांच्या शाळांचा विकास.
- शाळा न्यायाधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात न येणाऱ्या तक्रारींवर कार्यवाहीसाठी, दर महिन्याच्या पहिल्या सोमवारी शिक्षणदिन.
- राज्यातील शाळांमध्ये 'व्हर्च्युअल क्लासरूम'ची संकल्पना राबवणार, 'ई-लर्निंग'ला प्रोत्साहन देणार.
- विद्यार्थ्यांना पाणी पिण्याची आठवण करून देण्यासाठी शाळांमध्ये तीन वेळा 'वॉटर बेल' वाजवणार.
- दप्तराचे ओझे कमी करण्यासाठी १ ली ते ५ वीसाठी एकच पुस्तक.
- बालभारतीमार्फत तीन सेमिस्टरसाठी तीन पुस्तके.

मराठवाडा विभागातील शाळांच्या दुरुस्तीसाठी सुमारे एक हजार तीनशे कोटी रुपयांचा निधी.



# कौशल्य विकास

- औरंगाबादमध्ये कौशल्य विकास संकुल उभारणार.

**राज्यामध्ये आदर्श कौशल्य विकास केंद्रे निर्माण करणार**



**राज्यात कौशल्य विकास विभागांतर्गत कार्यरत असलेल्या ४१७ आयटीआय तसेच व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयातील क आणि ड वर्गातील कर्मचाऱ्यांच्या बदल्या त्यांच्या इच्छेनुसार ऑनलाईन पद्धतीने होणार. कौशल्य विकास विभागाचे पोर्टल सुरू, या ऑनलाइन प्रणालीमुळे बदल्यांची प्रक्रिया पारदर्शक आणि सूत्रबद्ध पद्धतीने होणार.**



## उच्च व तंत्रशिक्षण

- कोकण विभागासाठी स्वतंत्र विद्यापीठ स्थापन करणार.
- समुद्रविज्ञान, नारळसंशोधन, संशोधनप्रक्रिया, उद्योग, पर्यटन, व्यापारी जहाज वाहतूक असे व्यवसायिक अभ्यासक्रम तयार करणार.
- पैठण येथे विद्यापीठ निर्मितीसाठी समिती गठित करणार.
- उच्च व तंत्र शिक्षण विभागातील अध्यापक व प्राचार्यांच्या प्रशिक्षणासाठी अध्यापक विकास संस्था.
- पुणे विद्यापीठाचे नाशिक व अहमदनगर येथे उपकेंद्र कार्यान्वित करणार

## परिवहन व बंदरे

एसटी महामंडळाच्या २ हजार नवीन बसेससाठी ६00 कोटींचा प्रस्ताव.





मांडवा ते अलिबाग रस्त्याच्या रुंदीकरण कामाला गती; मुंबईतील भाऊचा धक्का ते मांडवा रो - पॅक्स फेरी सेवेला लवकरच प्रारंभ.

# सामान्य प्रशासन




जिल्हानिहाय लोकप्रतिनिधी व प्रशासनासमवेत बैठका. विकास कामांतील अडथळे दूर करून गतीमानता आणण्यावर भर

- महाराष्ट्र-कर्नाटक सीमाप्रश्नी दोन कॅबिनेट मंत्री समन्वय ठेवणार.
- **चिपी विमानतळाच्या पायाभूत सुविधांची कामे तातडीने, लवकरच विमानतळ कार्यान्वित.**
- देवस्थान समितीच्या जमिनींच्या सुलभ हस्तांतरणासाठी धोरण.
- राज्यातील शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा. केंद्राप्रमाणे प्रत्येक महिन्यातील सर्व शनिवारी व रविवारी सुट्टी.

सर्व विभागीय आयुक्तालयांत मुख्यमंत्री सचिवालय कक्ष कार्यान्वित.


सीएमओच्या दणक्याने तपानंतर नोकरी

महावितरण विभागातील प्रकार; कुटुंबाने केला आनंदोत्सव





'गोरगरिबांच्या मनात हे माझे सरकार आहे, अशी भावना निर्माण झाली पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी शासन कटिबध्द राहील.शिवनेरी आपले वैभव आहे. या वैभवाचा वारसा जतन करण्यासाठी, तो पुढे नेण्यासाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील. - मुख्यमंत्री उद्धव ठाकरे.

## पर्यटन

- मुंबईतील रोजगार निर्मिती, पर्यटन विकास आणि अर्थव्यवस्थेला चालना देऊ शकणाऱ्या महत्त्वाकांक्षी अशा 'मुंबई २४ तास' संकल्पनेची अमंलबजावणी.
- मुंबईत जागतिक दर्जाचे 'मल्टिलेव्हल ॲक्वेरिअम' उभारणार.
- वन पर्यटनाला चालना देण्यासाठी पर्यटन आणि वन महामंडळाची संयुक्त समिती गठित.
- शिर्डी विमानतळाच्या इमारतीचे विस्तारीकरण, नाईट लँडिंग सुविधा.



रायगड किल्ला जतन संवर्धनासाठी २० कोटी रुपयांचा निधी.

शिवनेरी विकास कामांसाठी २३ कोटी रुपयांचा निधी.





पैठण येथील ब्रम्हगव्हाण उपसासिंचन योजना येथील संत ज्ञानेश्वर उद्यानासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान वापरात आणून उद्यान पर्यटक भाविकांसाठी खुले करणार.

- रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी सिंधु-रत्न समृद्ध विकास योजना अमलात येणार.

मुंबई शहराचे आंतरराष्ट्रीय महत्त्व लक्षात घेऊन शहरातील पर्यटनस्थळांच्या संवर्धन आणि विकासासाठी आवश्यक निधी. शहरातील २२ महत्त्वाच्या ठिकाणांना प्राधान्य देऊन त्यांचा विकास करणार.



# मराठी भाषा

- शासकीय व्यवहारात मराठी भाषेचा वापर वाढविण्यावर भर.

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासाठी केंद्र सरकारकडे आग्रही मागणी. मुख्यमंत्र्यांचे प्रधानमंत्र्यांना पत्र.






शालेयस्तरावर अभ्यासक्रमात मराठी भाषा विषय सक्तीचा.

१०० दिवस

## कायदा व सुव्यवस्था

- लंडन-बकिंगहॅम पॅलेसच्या धर्तीवर महाराष्ट्र पोलीस मुख्यालयात महाराष्ट्र दिनापासून 'चेंज ऑफ गार्ड'.
- महिलांवरील अत्याचाराच्या प्रतिबंधासाठी कडक शिक्षेची तरतूद असलेला कायदा करणार. आंध्रप्रदेशातील 'दिशा' कायद्याचे प्रारूप अभ्यासून धोरण आखणार
- पोलिसांसाठी प्रत्येक जिल्ह्यात नेमबाजी प्रशिक्षण केंद्र उभारणार.
- मुंबई व पुणे शहरात सीसीटीव्ही सर्वेलन्स प्रकल्पातील कॅमेऱ्यांची संख्या वाढवणार.
- राज्यातील ११५० पोलीस ठाण्यात सीसीटिव्ही.

महाराष्ट्र पोलीस दलाच्या स्थापना दिनानिमित्त संचलनासह आणि मानवंदना समारंभाचे आयोजन करण्याचा निर्णय. पहिल्या समारंभात मुख्यमंत्री महोदयांना विविध पथकांची शानदार सलामी.





मुंबई पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी ४४८ सदनिकांच्या मरोळ येथील निवासस्थान प्रकल्पास गती.


- आपत्तीप्रसंगी मदतीसाठी डायल ११२ हेल्पलाईन प्रकल्प. मदतीसाठी १५०० चारचाकी, २००० दोनचाकी वाहने.

मुंबई पोलीस बंदोबस्त आणि गस्त यासाठी घोड्यांचा वापर करणार. पोलीसांच्या अश्वदलाचे पुनरुज्जीवन.




## सार्वजनिक बांधकाम

- महाराष्ट्र समृद्धी महामार्गासाठी भागभांडवल म्हणून अतिरिक्त साडे तीन हजार कोटी रुपयांचा निधी.
- मुंबईतील पूर्वमुक्त मार्ग (इस्टर्न फ्री-वे)ला लोकनेते विलासराव देशमुख यांचे नाव.
- औरंगाबाद- शिर्डीआणिऔरंगाबाद-अजिंठा रस्त्याच्या कामांना गती देणार. औरंगाबादेतून जाणाऱ्या द्रुतगतीमार्गाच्या आजूबाजूस ठरावीक अंतरावर ट्रॉमाकेअर उभारणार.
- रत्नागिरी जिल्ह्याला रायगडशी जोडणारा पूल मेरी टाईम बोर्डाच्यावतीने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या निधीतून पूर्ण करणार.



मुंबई-नागपूर महाराष्ट्र समृद्धी महामार्गाला हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांचे नाव.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या ‘ना देय प्रमाणपत्रा’साठी मुंबईत ‘एक खिडकी’ यंत्रणा कार्यान्वित.





टोलनाक्यांवरील वाहनांच्या रांगा कमी करण्यासाठी 'लेन'ची संख्या वाढवणार.

रस्ते बांधणीसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब. एक हजार किमी. रस्ते बांधण्याचे नियोजन. मृदा सुदृढीकरण तंत्रज्ञान वापरून अडीच हजार किमी., जर्मन तंत्रज्ञानाने ३ हजार किमी. रस्त्यांचे मजबुतीकरण. कोकण व पश्चिम घाटातील अडीच हजार किमी. रस्त्यांचे पोरस बिटूमन मिक्स पद्धतीने डांबरीकरण करणार.



## नगर विकास

- नगरपरिषद क्षेत्राचा विकास गतिमान करण्यासाठी बहुसदस्यीय प्रभाग पद्धतीऐवजी एकसदस्यीय प्रभाग पद्धती अवलंबणार.
- नगरपरिषद आणि नगरपंचायतींच्या नगराध्यक्षांची निवड ही निर्वाचित नगरसेवकांमधून करण्यात येणार
- राज्याच्या नागरी भागात ३९१ स्थानिक स्वराज्य संस्थांमधून निर्माण होणाऱ्या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या पहिल्या टप्प्यातील सांडपाणी प्रक्रिया आराखडा मंजूर.
- औरंगाबाद येथे शहराच्या विकास योजना, स्मार्ट शहर प्रकल्पासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नेमणूक.
- नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या कामामुळे विस्थापित होणाऱ्या मच्छीमारांच्या पुनर्वसनासाठी सर्वेक्षण होणार.
- नगरपरिषद प्रशासन संचालनालयाच्या ५५० पदांच्या सुधारित आकृतिबंधास मान्यता, यातून संचालनालयाच्या कामकाजात गुणात्मक सुधारणेमुळे बळकटीकरण होणार.

कचरामुक्त शहरांसाठी घनकचरा व्यवस्थापनचा राज्यस्तरीय प्रकल्प आराखडा तयार करणार.





समुद्रावरील सर्वात जास्त लांबीचा मुंबई - पारबंदर प्रकल्प (मुंबई ट्रान्स हार्बर लिंक) वेळेत पूर्ण करण्याचे नियोजन.

- सिडको प्रकल्पग्रस्त भूमिपुत्रांना शासनाच्या नियमाप्रमाणे किमान वेतन, सुट्ट्या, भत्ते, बोनस देणार.
- कल्याण-डोंबिवली महापालिकेत समाविष्ट २७ गावांसाठी स्वतंत्र नगरपालिकेच्या मागणीबाबत सकारात्मक विचार



पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) आणि पुणे मेट्रोच्या कामासाठी शिवाजीनगर- हिंजवडी मेट्रो मार्गिका क्र. ३ साठी आवश्यक १५ हजार चौ. मी. जागा देणार.



१००% दिवस

## उद्योग

- **मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांचा उद्योजकांशी मनमोकळा संवाद.**

  **'उद्योगांना येणाऱ्या अडचणींचे फास्ट ट्रॅकवर निराकरण; एकही उद्योग राज्याबाहेर जाऊ देणार नाही. शेती, शिक्षण, रोजगार या क्षेत्रामध्ये अमुलाग्र बदल घडविण्यासाठी उद्योजकांनी योगदान द्यावे.'**




Industry Interaction


MAGNETIC
MAHARASHTRA


MAHARASHTRA
Confederation of Indian Industry
125 Years: 1895-2020

- शेंद्रा- बिडकीन औद्योगिक क्षेत्रात पाचशे एकरवर अन्न प्रक्रिया केंद्र होणार, त्यामध्ये महिला उद्योजकांच्या प्रकल्पांसाठी शंभर एकर राखीव.
- स्थानिक कृषी उत्पादनावर आधारित लघू अन्न प्रक्रिया उद्योगांचे ‘मिनी फूड पार्क’ स्थापन करण्यास चालना देणार.
- मुंबई परिसरात आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र स्थापन होणार.
- माहिती तंत्रज्ञान क्षेत्राच्या वाढीसाठी आवश्यक असे ‘इन्क्युबेशन हब’ तयार करण्यात येणार



सोलापूर जिल्ह्यातील मौजे मोडनिंब व माढा येथे नव्याने एमआयडीसी स्थापन करण्याचा प्रस्ताव.



राज्यातील धोकादायक प्रकारातील उद्योगांचे सुरक्षा मानकांप्रमाणे परीक्षण (सेफ्टी ऑडिट) होणार.



तरुण नवउद्योजकांच्या कल्पनांना चालना देण्यासाठी एप्रिलमध्ये होणार ‘स्टार्टअप’ सप्ताह.

## वित्त व नियोजन

- जिल्हा नियोजन समित्यांचे कामकाज एप्रिल २०२० पासून आय-पास (इंटिग्रेटेड प्लानिंग ऑफिस ऑटोमेशन सिस्टीम) या संगणकीय प्रणालीद्वारे पेपरलेस होणार.
- राज्यातील मालमत्तांच्या खरेदी विक्री व्यवहारावरील मुद्रांकशुल्कात वाढ न करता रेडिरेकनरच्या दरात व्यावहारिकता, सुसूत्रता, तर्कसंगतता आणून महसूल वाढ करणार.
- महात्मा जोतिराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी १० हजार कोटी आकस्मिकता निधीतून घेण्यास मान्यता



मुंबई विद्यापीठाच्या फोर्ट इमारत व परिसराच्या 'हेरिटेज' सौंदर्यवृद्धीसाठी दोनशे कोटींचा निधी.

काजू उद्योगाला व्हॅटचा परतावा देणार आणि काजूपासून तयार होणाऱ्या फेणीला करसवलत देणार.





## वैद्यकीय शिक्षण



- लातूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय विज्ञान संस्था, लातूर असे नामकरण.
- वैद्यकीय शिक्षण अभ्यासक्रमात स्पोर्टर्स मेडिसीनचा समावेश करण्यात येणार
- जे.जे. रुग्णालयात कॅन्सर संशोधन विभाग सुरू करण्यात येणार
- औषध खरेदीबाबत धोरणात बदल करणार
- वैद्यकीय शिक्षण खाते आता अत्यावश्यक सेवेमध्ये येणार

## अन्न व नागरी पुरवठा

द्वारपोच धान्य व शिधापत्रिकेवरील वस्तू पोहचविण्याची योजना.





निराधार, दिव्यांग, कारागिरांना अंत्योदय योजनेच्या शिधापत्रिका

## महसूल

- महसूल चोरीला आळा घालण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित आर्थिक व्यवहारांसाठी यापुढे पॅन क्रमांक अनिवार्य करण्याचा निर्णय.
- कंपनी एकत्रीकरण किंवा पुनर्रचनेसंबंधीच्या दस्तांसाठी आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्कावर विहित केलेली कमाल मर्यादा २५ कोटींवरून ५० कोटींपर्यंत.
- नैसर्गिक आपत्तीबाधित गावांच्या पुनर्वसनासाठी सर्वंकष धोरण तयार करणार.
- महसूल वाढीसाठी राज्य उत्पादन शुल्क विभागांतर्गत मद्यनिर्माता ते मद्यविक्री दुकानांची जोडणी संगणकीकृत यंत्रणेद्वारे करून उत्पादन शुल्क विभाग करचोरीला आळा घालणार.



मुद्रांक नोंदणी कार्यालयात येणाऱ्या नागरिकांना चांगल्या सेवा मिळण्यासाठी अधिकाऱ्यांचा स्वतंत्र संवर्ग करणार आणि रिक्तपदे तातडीने भरणार.

## माजी सैनिक कल्याण

- माजी सैनिक आणि लष्करात कार्यरत जवानांच्या कुटुंबीयांना प्रधानमंत्री आवास योजनेतून प्राधान्याने घर देणार.
- आजी-माजी सैनिकांच्या घरांना घरपट्टीतून सूट देणार.

१००% दिवस

## पाणीपुरवठा व स्वच्छता

- सिल्लोड पाणी प्रश्नाच्या सोडवणुकीसाठी पूर्णानदीवरील अतिरिक्त बॅरेजेसबाबत सर्वेक्षण होणार.
- उजनी धरणातून सोलापूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या योजनेसाठी ११० किलोमीटर जागेचे सीमांकन करणार.

राज्यातील तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी स्वच्छता, पाणी, रस्ते, स्वच्छतागृहांसाठी आराखडा तयार करणार.



## राज्य उत्पादन शुल्क

अवैध मद्य निर्मिती, वाहतूक, विक्रीविरुद्ध नागरिकांना तक्रारी करण्यासाठी उपलब्ध असलेल्या नियंत्रण कक्षाचे टोल फ्री क्रमांक १८००८३३३३३३ तसेच व्हॉट्सअप क्रमांक ८४२२००११३३. तक्रारींवर प्राधान्याने कारवाई होणार. ग्रामसभांच्या विषयसूचीमध्ये ग्रामरक्षकदल स्थापनेचा विषय समावेश.

## अल्पसंख्याक विकास

**अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी आता राज्यभरात युपीएससीच्या तयारीकरिता प्रशिक्षण योजना**



## वने

- सन २०१९- २० या वर्षात पर्यायी वनीकरण निधी व्यवस्थापन प्राधिकरणास १८९ कोटींपैकी १५१ कोटी रुपये ‘कॅम्पा’अंतर्गत कामांसाठी वितरित.

**सिंधुदुर्ग जिल्ह्यातील तिलारी जलविद्युत प्रकल्पालगतच्या क्षेत्रामध्ये वन्यजीव विकासाठी ‘संवर्धन राखीव’ची निर्मिती करणार. ‘इको टुरिझम’ प्रकल्प होणार.**



१०० दिवस %

## जलसंपदा

- सिंधुदुर्गमधील मसुरे (आंगणेवाडी) लघुपाटबंधारे योजनेस २२ कोटी १२ लाख रुपयांचा निधी.
- निरा देवघर व गुंजवणी धरणाचे विनावापर राहणारे पाणी समन्यायी तत्त्वावर निरा उजवा आणि डावा कालवा लाभक्षेत्रात वाटप करणार.
- येलदरी धरणाची गळती दुरुस्त करून शेतीला मुबलक पाणी उपलब्ध करून देणार.
- उकई धरणातून जाणारे ५ टीएमसी पाणी उपयोगात आणण्यासाठी उपसा जलसिंचन योजना.
- निळवंडे धरणाची कामे २ वर्षांत पूर्ण करणार.



माजी मुख्यमंत्री दिवंगत डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या नावे जलभूषण पुरस्कार देणार.

## सांस्कृतिक कार्य

- प्रत्येक जिल्ह्यात कला अकादमी स्थापन करणार.
- मराठी चित्रपटांसाठी राज्यात 'लघू चित्रपटगृह'.
- नाट्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कलावंतास 'डॉ. श्रीराम लागू पुरस्कार' देणार.
- 'मुंबई बिनाले' महोत्सव आयोजनासाठी प्रयत्न.

महाराष्ट्राचे हीरकमहोत्सवी वर्ष थाटात साजरे करण्यासाठी राज्यात १ मे, २०२० पासून वर्षभर विविध कार्यक्रमांचे आयोजन.



१००% दिवस



## संत गाडगेबाबांची दशसूत्री

भुकेलेल्यांना • अन्न
तहानलेल्यांना • पाणी
उघड्यानागड्यांना • वस्त्र
गरीब मुलामुलींना • शिक्षणासाठी मदत
बेघरांना • निवारा, आश्रय
अंध, पंगू, रोग्यांना • औषधोपचार
बेकारांना • रोजगार
पशुपक्षी, मुक्या प्राण्यांना • अभय
गरीब तरुणतरुणींचे • लग्न
दुःखी व निराशांना • हिंमत

**“गाडगेबाबांच्या या शिकवणीनुसार आमचे शासन काम करणार आहे.”**

उद्धव ठाकरे
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य

मुख्यमंत्री उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी विधीमंडळाच्या नागपूर अधिवेशनामध्ये आपल्या वाटचालीची दिशा स्पष्ट केली. आपले सरकार संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीच्या शिकवणीनुसार काम करणार असल्याची त्यांनी ग्वाही दिली.

मार्च २०२०

मुख्यमंत्री सचिवालय (जनसंपर्क कक्ष) आणि माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

Visit: www.mahanews.gov.in | Follow Us: /MahaDGIPR | Like Us: /MahaDGIPR | Subscribe Us: /MaharashtraDGIPR